अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देणे तसेच राज्य सार्वजनिक उपक्रमांचे अंशकालीन व राज्यमंत्री दर्जा प्राप्त अध्यक्षांना द्यावयाच्या सेवा सुविधांबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक हातमाग-२०१८/प्र.क्र.११९/टेक्स-३

१४ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१०/प्रक्र ९६/१०/सा.उ., दिनांक १३/३/२०१२
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०७ डिसेंबर, २०१८.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन क्र. २) येथील दिनांक ०७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये श्री. प्रकाश नकुल पाटील यांची महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर च्या अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

२. आता श्री. प्रकाश नकुल पाटील, मु.पो. पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांना या शासन निर्णयान्वये राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात येत आहे.

३. श्री. प्रकाश नकुल पाटील, मु.पो. पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आलेला असल्याने त्यांना संदर्भाधीन क्र. १) येथील वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.शासाउ-१०.१०/प्रक्र ९६/१०/सा.उ., दिनांक १३/३/२०१२ सोबतच्या जोडपत्र-१ मधील रकाना ४ नुसार राज्यमंत्री दर्जा प्राप्त अंशकालीन अध्यक्षांना देय सोयीसुविधा अनुज्ञेय राहतील. तथापि, भारत सरकार राजपत्र दिनांक १ मे, २०१७ अनुसार वाहनावर “लाल दिवा” अनुज्ञेय असणार नाही.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१९०८२७१४३२४४७७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

PRAMOD DATTATRAYA TUPE

Digitally signed by PRAMOD DATTATRAYA TUPE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=25fb9d155cb4ae55ebc591d80f2e588a505237544f7c760ae3f32ae952f91058, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=750e3d339fabe697f13347901277e881075dd78c20a924b9acb3b93db44f2d61, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAMOD DATTATRAYA TUPE
Date: 2019.08.27 14:42:56 +05'30'

(प्रमोद द. तुपे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त, (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
९. श्री. प्रकाश नकुल पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ,मर्या., नागपूर.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ,मर्या., नागपूर.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१५. प्रादेशीक उपसंचालक, (वस्त्रोद्योग), नागपूर / औरंगाबाद / मुंबई / सोलापूर
१६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई
१७. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई
१८. कोषागार अधिकारी, नागपूर
१९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२०. निवड नस्ती (टेक्स-३)